# बृहन्मुंबई महानगरपालिका

(घन कचरा व्यवस्थापन खाते एस विभाग)

क्र. सअ/घकव्य/Q-37/2022-23/एस दि.23.08.2022

## स्वारस्य अभिव्यक्ती

सहाय्यक आयुक्त 'एस' विभागातील गणेश मुर्तीचे विसर्जन करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलाव (एकूण 14) स्थळी एन.जी.ओ. कामगारांमार्फत निर्माल्य गोळा करणे, सभोवतालच्या परिसराची साफसफाईचे काम करण्यासाठी इच्छुक स्थानिक संस्थाकडून अर्ज मागवित आहे.

इच्छुक संस्थांनी याबाबतचा तपशील, अर्ज एस विभाग कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर अथवा सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे संपर्क साधावा. सदर अर्जाचा नमुना हा रु. 220/- + 18% टक्के GST कर भरुन सहाय्यक अभियंता (घकव्य) एस विभाग यांच्या कार्यालयात उपलब्ध होईल.

संस्थेस अर्ज प्रदान करण्याची मुदत ही दि. 24.08.2022 ते दि.25.08.2022 रोजी दुपारी 04 वाजेपर्यंत राहील. तसेच अर्ज सादर करण्याच्या अंतिम वेळेनंतर म्हणजेच दि. 26.08.2022 रोजी दुपारी 1.00 नंतर निविदा अर्ज स्विकारले जाणार नाहीत. संस्थेची मुळ कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे. अर्धवट तसेच चुकीचे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर योजनेची सोडत ही दिनांक 26.08.2022 रोजी संध्याकाळी 4.00 वाजता सहाय्यक अभियंता (घकव्य) एस विभाग यांच्यादालनात घेण्यात येईल. सदर कामाकरीता एक स्वतंत्र संस्था प्रतिक्षा यादीमध्ये घेण्यात येतील. सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या संस्थेने विहित वेळेत आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास, मनपाच्या प्रचलित पध्दतीनुसार प्रतिक्षा यादीतील संस्थेस सदर काम योग्य त्या कागदपत्रांची विहित वेळेत पुर्तता करण्यासापेक्ष देण्यात येईल.

सदर सोडती करिता सर्व पात्र संस्थेचे अध्यक्ष / उपाध्यक्ष/ खजिनदार यौपकी एक पदाधिकारी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. याची कृपया नोंद घ्यावी. कोणत्याही संस्थेचे एक पेक्षा जास्त पदाधिकारी यांना सहाय्यक अभियंता (घकव्य) एस विभाग यांच्या दालनात प्रवेश देण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**

**सहाय्यक आयुक्त 'एस' विभाग**